विक्रीकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई
दिनांक 31 DEC 2012
आवक क्र. 1014

व्यवसायकराखालील थकबाकी वसूलीसाठी व अनोंदित करदात्यांचे सर्वेक्षण तसेच करवसूली करण्याकरिता अभिकर्त्यांना दयावयाच्या प्रोत्साहन रकमेत वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्र.विसआ-२२१२/प्र.क्र.३/कराधान-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २७ डिसेंबर, २०१२

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक : व्यकर ११०२/प्र.क्र.५८/२००२/कराधान ३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ एप्रिल २००२.

२) शासन निर्णय क्रमांक : व्यकर ११०२/प्र.क्र.५८/२००२/कराधान ३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० सप्टेंबर, २००२.

**प्रस्तावना :**

व्यवसायकर थकबाकी वसूलीकरिता व्यवसायकर आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी नेमणूक केलेल्या वसूली अभिकर्त्यांना वसूलीच्या ७ % आणि व्यवसायकर भरण्यास पात्र तथापि अनोंदित राहिलेल्या अशा व्यवसायकरदात्यांचा सर्वेक्षणाद्वारे शोध घेऊन त्यांचेकडून संबंधित कालावधीच्या थकीत व्यवसायकर वसूलीतून शासनास प्राप्त होणा-या महसूलाच्या १० % प्रोत्साहन रक्कम देण्यात येते.

सदर प्रोत्साहनपर रक्कमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

व्यवसायकर वसुली अभिकर्त्यांनी जुन्या व्यवसायकर थकबाकीपैकी देय व्यवसायकर, व्याज व दंडाची १०० % रक्कम वसुल केल्यास, त्यांना प्रत्यक्ष वसुल केलेल्या रक्कमेवर ८ % प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येईल तसेच अनोंदित करदात्यांचे सर्वेक्षण करून, नावनोंदणी दाखला/नोंदणी दाखला देऊन, त्यांचेकडून, संबंधित कालावधीसाठी देय व्यवसायकर, व्याज व दंडाची १००% रक्कम वसुल केल्यास, त्यांना प्रत्यक्ष वसुल केलेल्या रक्कमेवर ११ % प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येईल.

अभिकर्त्यांना दयाव्या लागणा-या प्रोत्साहन रकमेवरिल खर्च "मागणी क्र.जी - १ लेखाशिर्ष २०२०- उत्पन्न व खर्च यावरिल कराची वसूली -००१, संचालन व प्रशासन- व्यवसाय, व्यापार, अजिविका व नोक-या यावरिल कर (१) विक्रीकर आयुक्त ( २०२० ००२३) - १२, व्यावसायिक व विशेष सेवांसाठी प्रदाने, "याअंतर्गत मंजूर करण्यात येणा-या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१२१२१५१५३८००२५०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भांगडीया
२८।१२।१२

(ओ.चै.भांगडीया)
शासनाचे उप सचिव

प्रति
विक्रीकर आयुक्त , महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई -४०० ०१०.
अपर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई -४०० ०१०.

प्रत,

राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सहाय्यक.
सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
सर्व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
बहुजन समाज पार्टी, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई.
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई.
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४ राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई.

ारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३.

इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.

नॅशनल कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई २१.

महालेखापाल (लेखा परीक्षा) - १ महाराष्ट्र मुंबई.

महालेखापाल (लेखा परीक्षा) -२ महाराष्ट्र नागपूर.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १ महाराष्ट्र मुंबई.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २ महाराष्ट्र नागपूर.

महालेखापाल (वाणिज्यीक लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.

सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्रान्वये).

प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई (पत्रान्वये).

प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई (पत्रान्वये).

जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालना, मुंबई.

निवड नस्ती, कराधान- ३.